# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ८४-२२** **दिनांक - ११/०३/२०२२**

## ड्रोन वापराबाबत फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ (१) (२) प्रमाणे मनाई आदेश जारी.

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दहशतवादी व समाज विघातक कृत्य करणाऱ्या घटकांकडुन Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft च्या सहाय्याने हल्ला करुन मानवी जिवीतास, आरोग्यास, संरक्षणास बाधा निर्माण करण्याची तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे मर्मस्थळे, संवेदनशिल व संरक्षीत ठिकाणांचे दहशतवादी व समाज विघातक कृत्य करणाऱ्या घटकांकडुन Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft, arial missiles इ. च्या सहाय्याने निरीक्षण व रेकी करुन घातपाती कारवाई करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त बाबी विचारात घेवून श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात "Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft, arial missiles "ज्यामुळे मानवी जिवीतास, आरोग्यास, संरक्षणास बाधा निर्माण करण्याची तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याची शक्यता आहे अशा "Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft, arial missiles " चा वापर यावर प्रतिबंध करण्यासाठी मनाई आदेश जारी केला आहे. मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीसांकडुन करण्यात येणाऱ्या हवाई सर्वेक्षणास व मा. पोलीस आयुक्त यांचेकडुन विशेष परवानगीने करण्यात येणाऱ्या ड्रोन वापरास सदर मनाई आदेशातील तरतुदी लागु असणार नाही.

सदर आदेश हा **दिनांक १३/०३/२०२२ रोजी ००.०१ पासुन ते दिनांक १०/०५/२०२२ रोजी २४.०० वाजे पावेतो मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्राकरिता** लागु राहणार आहे.

---ooo---